**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५७ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | अ. हमीद महंमद मणियार<br>१९७०, तुळशीराम रोड, बार्शी, ता. बार्शी,<br>जि. सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका कृषि अधिकारी, बार्शी,<br>ता. बार्शी, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपविभागीय कृषि अधिकारी, कुर्डूवाडी<br>ता. माढा, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. अ. हमीद महंमद मणियार यांनी रोजगार हमी योजनेच्या मस्टर नं.१२३०५-२६ वरील नावे व गोडेगांव, खडकलगाव धान्य वाटपाचा तपशील आणि कूपन नंबर १४०६३८ या पुढील कुपने व मागील नंबरच्या कुपनांचा तपशील जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बार्शी यांच्याकडे मागितला होता. मागणी केलेली माहिती प्राप्त झाली आहे, त्यामुळे तक्रार राहिलेली नाही, असे अपीलकर्त्याने आयोगास दि. ११.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
दि. ३० .८.२००८

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर,पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६८/ सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. विजय सदाशिव अडसूळ .<br>मु.पो.शेळगाव (आर) ता .बार्शी ,<br>जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, बार्शी, जि . सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, बार्शी, जि. सोलापूर | गैरहजर |

बार्शी तालुक्यात एकूण किती सर्कल ऑफिस आहेत, ते कोणते, प्रत्येक सर्कल ऑफिसखाली येणारी गावे कोणती, वैराग सर्कलला कोणती गावे येतात, तालुक्यातील केरोसीन एजटांच्या एजन्सीची नावे, पत्ते, दूरध्वनी, भ्रमणध्वनि, प्रतिमाणसी रेशन दुकानांमधून मिळणाऱ्या धान्याचे प्रमाण, रास्तभाव दुकानदारांची नावे, इत्यादी अनेक मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री. विजय सदाशिव अडसूळ यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी यांच्याकडे मागितली होती. सदर माहिती संबंधित कार्यालयाने विलंबाने दिली. त्यामुळे दंडात्मक कारवाई करण्याची अपीलकर्त्याची मागणी आहे .मागणी केलेल्या माहितीचे स्वरूप व इतर कागदपत्रांचे अवलोकन केले असता, माहिती सहजतेने देणे शक्य असतानाही तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी श्री. किरण बी. काकडे यांनी १८ दिवस विलंब केला आहे. पत्रावर नमूद केलेल्या तारखा व टपालात पाठविल्याच्या तारखा यातील खाडाखोड, विसंगती (उदा. पत्रावर दि. १.३.२००७, टपालाचा शिक्का दि.२०.३.२००७ चा ) असे अनेक प्रकार श्री. अडसूळ यांनी संबंधित कागदपत्रांसह मांडले. विलंब झाल्यावर माहिती निःशुल्क देणे बंधनकारक असतानाही जन माहिती अधिकारी श्री. किरण काकडे यांनी श्री. अडसूळ यांच्याकडून शुल्क घेतले.

तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी श्री. व्ही. एम. चौगुले यांनी १६ महिने अपिलाची दखल घेतली नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे. तत्कालीन निवासी नायब तहसीलदार व लिपीक यांनी कागदपत्रे आपणापर्यंत येऊ न दिल्यामुळे व नंतर ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या निवडणुकांमुळे अपिलाची दखल घेण्यास विलंब झाला, असा खुलासा तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी श्री. व्ही. एम.चौगुले (आता सेवानिवृत्त) यांनी लेखी निवेदनात केला आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. किरण बी. काकडे यांनी माहिती देण्याबाबत केवळ विलंबच केला आहे, असे नव्हे, तर अनास्थाच दर्शविली आहे. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) अपील मान्य.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. किरण बी. काकडे यांनी उत्तर देण्यास १८ दिवस विलंब केल्याने प्रतिदिनी रू.२५० प्रमाणे रू.४५००/- शास्ती करण्यात येत आहे. त्यांच्याकडून ही रक्कम ऑक्टोबर महिन्यात मिळणाऱ्या सप्टेंबर २००८ च्या वेतनातून वसूल करून ती '००७, इतर प्रशासकीय सेवा,६०, इतर सेवा, ८००,इतर जमा रकमा,(१८) माहितीचा अधिकार (००७००१६ ' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही तहसीलदार, बार्शी श्री. व्ही.एम.कुचेकर यानी करून, तसेच या बाबीची संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात नोंद घेऊन त्यांच्या छायांकित प्रतीसह पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

३) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलीय प्राधिकारी यांनी जास्तीत जास्त ४५ दिवसांत अपिलाचा निर्णय करणे आवश्यक असून तशी कार्यवाही न करणे हा नियमभंग ठरून कारवाईस पात्र ठरेल, याची समज अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार बार्शी श्री. व्ही. एम. कुचेकर यांना देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि.३० .०८.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७३ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. राजकुमार संदिपान जाधव<br>मु.पो. महूद बु. ता. सांगोला, जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | कार्यकारी अभियंता,<br>निरा उजवा कालवा विभाग, फलटण<br>ता. फलटण, जि. सातारा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक अभियंता,<br>पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे<br>सिंचन भवन, बारणे रस्ता, पुणे | गैरहजर |

निरा उजवा कालवा, विभाग फलटण अंतर्गत मे २००६ ते एप्रिल २००७ अखेर एकूण किती कामे करण्यात आली, त्यांची अंदाजित रक्कम, काम केलेल्या संस्थेचे नाव, सदर कामावर झालेला खर्च, काम सुरू झाल्याची व संपल्याची तारीख इ. माहिती अपीलकर्ता श्री. राजकुमार संदिपान जाधव यांनी मागितली होती.

माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्ता यांनी वरील घटकांमधील चर्चेअंती लेखी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३०.८.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौसिल हॉलसमोर,
पुणे -४११ ००१

श्री.ज्ञानोबा शंकर कोद्रे
मुंढवा, फ्लोरिडा इस्टेट, पुणे-४११०३६ अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय आयुक्त, पुणे विभाग,
विधान भवन, पुणे- १ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आयुक्त व प्रादेशिक संचालक,
नगरपालिका प्रशासन, विधान भवन, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.ज्ञानोबा शंकर कोद्रे
मुंढवा, फ्लोरिडा इस्टेट, पुणे-४११०३६

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय आयुक्त, पुणे विभाग,
विधान भवन, पुणे- १ प्रतिनिधी श्रीमती अमिता तळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा आयुक्त व प्रादेशिक संचालक,
नगरपालिका प्रशासन, विधान भवन, पुणे-१ प्रतिनिधी श्री.ए.ए.शेख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.४.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.४.२००५ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.४.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पुण्यालगतची धानोरी, बोपखेल आदी नऊ गावे पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्याचा पुणे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि.१२.८.१९९२ रोजी झालेल्या ठरावाची दि.१२.८.१९९२ ठराव वृत्तांत प्रत व अंमलबजावणी होण्याबाबत. | |

## विवेचन

पुण्यालगतची धानोरी, बोपखेल आदी नऊ गावे पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्याचा ठराव पुणे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि.१२.८.१९९२ रोजी झाला. त्या ठरावाची अंमलबजावणी का झाली नाही, अशी माहिती अपीलकर्ता श्री.ज्ञानोबा शंकर कोद्रे यांनी जन माहिती अधिकारी तथा आयुक्त व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, विधान भवन, पुणे यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर दिले, परंतु श्री.कोद्रे यांनी त्याविरुध्द अपील केले. अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यानी ते अमान्य केले. जवळजवळ एक वर्षाने श्री.कोद्रे यांनी अपील केले. त्यावर अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय आयुक्त यांनी निर्णय दिला. त्याविरुध्द श्री.कोद्रे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

संबंधित नऊ गावे महापालिका हद्दीत समाविष्ट व्हावीत अशी मागणी श्री.कोद्रे गेल्या काही वर्षांपासून करीत आहेत. १९९७ साली हा विभाग नगरपालिका हद्दीत समाविष्ट केला, पण २००१ साली पुन्हा वगळला, यावरुन ठरावाची अंमलबजावणी होत नाही, ती का होत नाही हे आपल्याला कळले नाही, असे प्रतिपादन श्री.कोद्रे यांनी केले.आवश्यक ती माहिती त्यांना देण्यात आली आहे. परंतु महापालिका क्षेत्रात वाढ करण्याचा अधिकार शासनाच्या नगरविकास विभागाला आहे, त्यासाठी नगरविकास संचालनालय, नगरविकास विभाग, मंत्रालय यांच्याशी संपर्क साधण्याबाबत त्यांना सातत्याने कळविण्यात आले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा

विभागीय आयुक्त यांनी आयोगापुढे लेखी नमूद केले. श्री.कोंद्रे यांचा विषय हा प्रशासकीय कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.८.८.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

ऑगस्ट-०८-६१-६३

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८५ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. बाळासाहेब संपतराव तापकिरे<br>मु.पो. ता. बार्शी, कुर्डुवाडी रोड, जैन मंदिर, बळीरामनगर, जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | जनरल सेक्रेटरी, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, जि. सातारा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अध्यक्ष, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. बाळासाहेब संपतराव तापकिरे यांनी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळात प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी यांची जातीनिहाय (रोस्टर) संख्या, रिकाम्या पदांची संख्या आणि भरती करण्यात येणाऱ्या पदांची संख्या जन माहिती अधिकारी तथा जनरल सेक्रेटरी, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांच्याकडे मागितली होती.

माहिती मिळाली असून शासन निर्णयानुसार जातीच्या बिंदू नामावली प्रमाणे कोड क्रमांक नसल्याचे अपीलकर्त्याने लेखी नमूद केले. वरील घटकांमधील चर्चेत अपीलकर्त्याचे शंकानिरसन केल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .८.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

ॲड.दौलत वि.मोरे
मु.पिंपरे खुर्द, पो.निरा, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९३ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड.दौलत वि.मोरे
मु.पिंपरे खुर्द पो.निरा, ता.पुरंदर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा श्री.हिम्मतराव खराडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.५.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>दि.२३.२.२००६ रोजी सातारा येथील दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात क्र.रे.दि.मु.नं.८५/२००३ मध्ये ज्युरिस्डीक्शनच्या मुद्दयावरील सरकार पक्षाचा अर्ज नाकारला त्याविरुध्द अपील केले आहे का, नसल्यास का केले नाही. |

## विवेचन

निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा यांनी सातारा येथील दिवाणी न्यायालयामधील प्रकरणात लेखी निवेदन सादर करण्याच्या संदर्भात अपीलकर्ता ॲड.दौलत वि.मोरे यांनी जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, फलटण यांच्याकडे माहिती मागितली होती. त्या अनुषंगाने अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे अपील करणे आवश्यक होते. ते न करता चुकून राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले गेले आहे. ते आपण मागे घेत आहोत, असे लेखी निवेदन ॲड.मोरे यांनी दि.२१.५.२००८ रोजी आयोगाला सादर केले. त्याची विनंती मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८.८.२००८

ऑगस्ट-०८-८४-८५

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२० / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. बिरा महादेव मदने<br>मु. तिसंगी, पो. सोनके, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्रामसेवक, ग्रामपंचायत तिसंगी, ता. पंढरपूर<br>जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती पंढरपूर,<br>ता. पंढरपूर, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. बिरा महादेव मदने यांनी सन १९७० ते १९८० या कालावधीतील मौजे तिसंगी, पो. सोनके, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील घर नंबर ४२ व ५९ चे नमुना ८ (असेसमेंट लिस्ट) प्रतीची मागणी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत तिसंगी, ता. पंढरपूर यांच्याकडे केली होती.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस.एम. येलपले यांनी दप्तर उपलब्ध झालेले नसल्याने अपीलकर्त्याने मागणी केलेली कागदपत्रे उपलब्ध करून देण्यास अडचणी येत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. तसेच संपूर्ण गावाचे नमुना क्र.८ घर नोंदणी रजिस्टर सन १९९९ पूर्वीपासून गहाळ असल्याचे म्हटले आहे. संपूर्ण गावाचे एखादे महत्वाचे रजिस्टर गहाळ होते आणि वर्षानुवर्षे त्याबाबत काही कारवाई केली जात नाही, ही बाब गंभीर स्वरूपाची आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याच्या मागणीप्रमाणे माहिती २० दिवसांच्या आत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी यांची राहील. त्याप्रमाणे अनुपालन अहवाल दि. २०.९.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा. अन्यथा गहाळ झालेल्या अभिलेखासंदर्भात संबंधितांवर तात्काळ गुन्हा दाखल करावा व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेमार्फत आयोगास अहवाल सादर करावा.

**पुणे**
**दि. ३०.८.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**